पुढारी

# लोकसहभागातून बस पास देणार

## पालकमंत्र्यांची घोषणा; विद्यापीठ कार्यक्षेत्रातील दहा हजार मुलींना होणार लाभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

**पुढील शैक्षणिक वर्षात शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांत शिक्षण घेणाऱ्या गरजू १० हजार मुलींचा वर्षाचा बस पास लोकसहभागातून उपलब्ध करून देणार असल्याची घोषणा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी शुक्रवारी येथे केली.**

- **विद्यापीठात १०० मुलींचे वसतिगृह लवकरच साकारणार**
- **शिवाजी विद्यापीठात मोफत बस पास वाटप**

शिवाजी विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयांतील आर्थिक दुर्बल घटकातील १ हजार विद्यार्थिनींना लोकसहभागातून पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते प्रातिनिधिक बस पास वितरण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. पालकमंत्री पाटील यांनी यावेळी विद्यापीठास ९ लाख रुपयांचा धनादेश दिला. राजर्षी शाहू सिनेट सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

पालकमंत्री पाटील म्हणाले, प्रवासासाठी पैसे नाहीत म्हणून जिल्ह्यातील एकही विद्यार्थिनी शिक्षणापासून वंचित राहणार नाही. विद्यापीठाच्या पुढाकाराने हाती घेतलेला हा उपक्रम स्तुत्य आहे. त्यामुळेच पुढील वर्षापासून हा उपक्रम व्यापक प्रमाणावर राबवणार आहे. विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी लोकसहभागातून १०० मुलींची क्षमता असणारे वसतिगृह लवकरच साकारले जाईल. यासह महाविद्यालयांमध्ये महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह उभारण्याची योजनाही लोकसहभागातून राबविली जाईल. याकामी विद्यापीठाने पुढाकार घ्यावा. जिल्ह्यात २७ ठिकाणी स्वच्छतागृहे व १३ बस थांबे उभारले आहेत. चांगल्या कामासाठी लोक आम्हाला स्वत:हून पैसे देत आहेत. वैद्यकीय उपचार आणि मुलींचे शिक्षण **पान २ वर ▶**




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयीन विद्यार्थिनींना शुक्रवारी बस पास वितरित करताना पालकमंत्री चंद्रकांत पाटील. शेजारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर आदी.**

पुढारी

# लोकसहभागातून बस पास देणार

(**पान १ वरून**) या दोन गोष्टी मी प्राधान्याने मार्गी लावत आहे. विद्यापीठ परिसरातील भिंती चित्रकारांच्या साहाय्याने बोलक्या कराव्यात. यासाठीची मदत करण्याचेही त्यांनी सांगितले. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थिनींसाठी लोकसहभागातून हा उपक्रम यशस्वीपणे राबविला जाईल.

यावेळी पॅराऑलिम्पिकमधील आंतरराष्ट्रीय खेळाडू स्वरूप पन्हाळकर याला आर्थिक मदतीचा धनादेश पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते देण्यात आला. प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी सिनेट सदस्य, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थिनी उपस्थित होते.

प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास शिवाजी विद्यापीठाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी व्ही. टी. पाटील आदींसह सिनेट सदस्य, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थिनी उपस्थित होते.

**कोल्हापुरातून १२ खेळाडू ऑलिम्पिकला जावेत**

जिल्ह्यातील खेळाडूंना पाठबळ देण्याची भूमिका असल्याचे सांगताना पालकमंत्री पाटील म्हणाले, अनेक खेळाडूंना सहाय्य करून त्यांना प्रोत्साहित करण्यात आले आहे. यातील काहीजण आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचले आहेत. आगामी मेन, युवा व पॅराऑलिम्पिकमध्ये जिल्ह्यातील किमान १२ खेळाडू सहभागी होतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. या खेळाला शिवाजी विद्यापीठाने प्राधान्य द्यावे, अशी सूचना त्यांनी केली.

**वैद्यकीय उपचारासाठी तत्काळ सहाय्य**

पालकमंत्री पाटील म्हणाले, जिल्ह्यातील महिला आणि मुलींसह गरजूंना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचा संकल्प केला असून एकही व्यक्ती पैशाअभावी आरोग्य सेवेपासून वंचित राहू नये, अशी व्यवस्था केली आहे. जिल्ह्यातून मुंबई येथे उपचारासाठी जाणाऱ्या रुग्ण तसेच त्यांच्या नातेवाईकांसाठी राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. याबाबतची काही उदाहरणेही त्यांनी सांगितली.

लोकमत

## चंद्रकांत पाटील; शिवाजी विद्यापीठाच्या योजनेसाठी निधी प्रदान

# दहा हजार विद्यार्थिनींना मोफत बस पास देणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या १० हजार विद्यार्थिनींना पुढील शैक्षणिक वर्षामध्ये लोकसहभागातून बस पास उपलब्ध करुन दिला जाईल. विद्यापीठात विद्यार्थिनींसाठी नवे वसतिगृह उभारण्यासाठी मदत करणार असल्याची ग्वाही पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी शुक्रवारी येथे दिली.



शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी आर्थिक दुर्बल गटातील विद्यार्थिनींसाठीच्या बस पास योजनेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते योजनेचा निधी विद्यार्थिनींना वितरित करण्यात आला. यावेळी डावीकडून विलास नांदवडेकर, देवानंद शिंदे, डी. टी. शिर्के, आदी उपस्थित होते.

उच्च शिक्षण घेणाऱ्या आर्थिक दुर्बल गटातील विद्यार्थिनींसाठी विद्यापीठातर्फे बस पास योजना राबविण्यात येणार आहे. त्या योजनेचे उद्घाटन आणि योजनेसाठी लोकसहभागातून जमविण्यात आलेला निधी विद्यापीठास प्रदान करणे, या कार्यक्रमात ते बोलत होते. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे होते. यावेळी पालकमंत्री पाटील म्हणाले, विद्यापीठाने आर्थिक दुर्बल गटातील विद्यार्थिनींचे उच्चशिक्षण केवळ बस पासअभावी रखडू नये, त्यांना त्यांची शैक्षणिक प्रगती साध्य करता यावी, चांगले करिअर करता यावे, यादृष्टीने आखलेली योजना चांगली आहे. विद्यापीठाच्या या प्रामाणिक प्रयत्नांना पाठबळ लाभावे. कार्यक्षेत्रातील विद्यार्थिनींचे शैक्षणिक कल्याण व्हावे, या हेतूने आम्ही सुमारे नऊ लाख रुपयांचा निधी जमा केला. त्यासाठी संवेदना फौंडेशन, रोहिणी ज्वेलर्स यांनी हातभार लावला. कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, विद्यापीठ संलग्न महाविद्यालये आणि अधिविभागात प्रवेश घेतलेल्या आर्थिक दुर्बल घटकातील एक हजार विद्यार्थिनींना तीन महिन्यांचा बस पास वितरित केला जाणार आहे.

पालकमंत्री पाटील यांनी नऊ लाख रुपयांच्या निधीचा धनादेश कुलगुरु डॉ. शिंदे यांच्याकडे सुपूर्द केला. प्रातिनिधिक स्वरुपात काही महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यार्थिनींना बस पास योजनेसाठी निधीचे वितरण झाले. पॅराऑलिम्पिकमधील आंतरराष्ट्रीय खेळाडू स्वरुप पन्हाळकर याला आर्थिक मदतीचा धनादेश देण्यात आला. यावेळी विद्यापीठाचे लेखा व वित्त अधिकारी व्ही. टी. पाटील, उपकुलसचिव रमेश लिधडे, बाळासाहेब यादव, संवेदना सोशल फौंडेशनचे अध्यक्ष राहुल चिकोडे, आदी उपस्थित होते. प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

### पालकमंत्री पाटील म्हणाले

- विद्यापीठाच्या परिसरातील भिंती आदर्श, बोलक्या करा, त्यासाठी मदत केली जाईल.
- विद्यापीठाने क्रीडाक्षेत्राला प्राधान्य द्यावे.
- बस पासला पैसे नाहीत म्हणून शिक्षणापासून जिल्ह्यातील एकही विद्यार्थिनी वंचित राहणार नाही.
- विद्यार्थी विकासाला चालना देणाऱ्या उपक्रमांना सहकार्य राहील.

सकाळ

# विद्यार्थिनींच्या उच्चशिक्षणासाठी प्रयत्नशील

## चंद्रकांत पाटील : आर्थिक दुर्बल गटातील विद्यार्थिनींसाठी बस पास योजनेचे उद्‌घाटन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २५ : 'केवळ आर्थिक कारणांमुळे शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एकही विद्यार्थिनी उच्चशिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी विद्यापीठ प्रशासनाबरोबरच शासकीय व वैयक्तिक स्तरावर प्रयत्नशील राहू,' अशी ग्वाही पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज येथे दिली.

शिवाजी विद्यापीठातर्फे उच्चशिक्षण घेणाऱ्या आर्थिक दुर्बल गटातील विद्यार्थिनींसाठी बस पास योजना जाहीर करण्यात आली होती. त्या योजनेचे उद्‌घाटन, योजनेसाठी लोकसहभागातून जमलेला निधी विद्यापीठास प्रदान करणे व प्रातिनिधिक स्वरुपात प्राचार्य, महाविद्यालयीन विद्यार्थिनींना बस पास योजनेसाठी निधीचे वितरण अशा संयुक्त कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते. राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम झाला. श्री. पाटील म्हणाले, ''शासनातर्फेही मोफत बस पास योजना आहे.

पान ४ वर »



**कोल्हापूर : विद्यार्थिनींच्या बस पास योजनेसाठी प्रातिनिधिक स्वरुपात प्राचार्य आणि विद्यार्थिनींना धनादेश प्रदान करताना पालकमंत्री चंद्रकांत पाटील. शेजारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर.**

सकाळ

# विद्यार्थिनींच्या उच्चशिक्षणासाठी प्रयत्नशील

» पान १ वरून

योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासकीय स्तरावरुन मोठ्या प्रमाणावर प्रयत्न होत असले तरी तिला काही मर्यादा आहेत. त्यामुळे सर्वदूर विद्यार्थ्यांपर्यंत ती पोहोचू शकत नाही. विद्यापीठाने मात्र आर्थिक दुर्बल गटातील विद्यार्थिनींचे उच्चशिक्षण केवळ बस पासअभावी रखडू नये याकरिता आखलेली योजना चांगली आहे. विद्यार्थ्यांच्या शुल्कातून जमा झालेल्या विद्यापीठ फंडावर त्याचा भार न टाकता लोकसहभागातून निधी उभारून त्या माध्यमातून या योजनेची यशस्वी अंमलबजावणी करण्याचे धोरण स्वीकारले, ही बाबही स्तुत्य आहे. विद्यापीठाच्या या प्रयत्नांना पाठबळ देण्याच्या हेतून आम्ही सुमारे नऊ लाख रुपयांचा निधी जमा केला आहे. तो विद्यापीठाकडे आज सुपूर्द करताना आनंद होत आहे. संवेदना फाऊंडेशन व रोहिणी ज्वेलर्स यांनी त्यासाठी हातभार लावला आहे.''

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, ''विद्यार्थिनींसाठी बस पास योजनेबरोबरच संलग्नित महाविद्यालयांत स्वच्छतागृह उभारण्यासाठी लोकसहभागातून निधी उपलब्ध करण्याचे नियोजन आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने उभारण्यात येणाऱ्या स्वच्छतागृहांच्या एका युनिटचा खर्च एक लाख रुपये इतका आहे. प्राथमिक टप्प्यात गरजू संलग्नित महाविद्यालये निवडून त्यांना अशी स्वच्छतागृहे तयार करून देण्याचा मानस आहे. यासाठीही दानशूर व्यक्ती आणि संस्थांनी पुढाकार घेऊन आर्थिक मदत करावी.'' विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम भागास कायमस्वरुपी जोडण्यासाठी सब-वे बांधणे, विद्यापीठाच्या संरक्षक भिंतींवर 'सुंदर कोल्हापूर'चे दर्शन घडविण्यासाठी कोल्हापूरच्या कलाकारांतर्फे कला-संस्कृतीदर्शक चित्रे काढून घेणार असल्याचे सांगितले. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

# मुलींना उच्च शिक्षण देण्यासाठी प्रयत्नशील

## पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील ; बस पाससाठी ९ लाख रुपये

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

केवळ आर्थिक कारणांमुळे शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एकही विद्यार्थिनी उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी विद्यापीठ प्रशासनाबरोबर शासकीय तसेच वैयक्तिक स्तरावरही सदैव प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठातर्फे उच्च शिक्षण घेणाऱ्या आर्थिक दुर्बल गटातील विद्यार्थिनींसाठी बस पास योजना जाहीर करण्यात आली होती. त्या योजनेचे उद्‌घाटन आणि योजनेसाठी लोकसहभागातून जमविण्यात आलेला निधी विद्यापीठास प्रदान करणे तसेच त्याचे प्रातिनिधिक स्वरूपात प्राचार्य, महाविद्यालयीन विद्यार्थिनींना वितरण असा संयुक्त समारंभ शुक्रवारी दुपारी शिवाजी

विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात पार पडला. त्यावेळी मंत्री चंद्रकांतदादा पाटील बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

मंत्री पाटील म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने आर्थिक दुर्बल गटातील विद्यार्थिनींचे उच्च शिक्षण केवळ बस पासअभावी रखडू नये आणि त्यांना त्यांची शैक्षणिक प्रगती साध्य करता यावी, चांगले करिअर करता यावे यादृष्टीने आखलेली योजना अत्यंत चांगली आहे. विशेषतः विद्यार्थ्यांच्या शुल्कामधून जमा झालेल्या विद्यापीठ फंडावर त्याचा भार न टाकता लोकसहभागातून निधी उभारून त्या माध्यमातून या योजनेची यशस्वी अंमलबजावणी करण्याचे धोरण स्वीकारले, ही बाबही स्तुत्य आहे. विद्यापीठाच्या या प्रामाणिक प्रयत्नांना पाठबळ लाभावे आणि कार्यक्षेत्रातील विद्यार्थिनींचे शैक्षणिक कल्याण व्हावे या हेतूने आम्ही सुमारे ९ लाख

रुपयांचा निधी जमा केला आणि तो विद्यापीठाकडे सुपूर्द करीत असताना अतिशय आनंद होतो आहे. यापुढील काळात शिवाजी विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी लोकसहभागातून १०० मुलींची क्षमता असणारे वसतिगृह उभारण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील आर्थिक दुर्बल गटातील विद्यार्थिनींच्या बस पास योजनेसाठी प्रातिनिधिक स्वरूपात महाविद्यालयांचे प्राचार्य व विद्यार्थिनींना धनादेश प्रदान करताना पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील.**

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, विद्यार्थिनींसाठी बस पास योजनेबरोबरच संलग्नित महाविद्यालयांमध्ये स्वच्छतागृह उभारण्यासाठीही लोकसहभागातून निधी उपलब्ध करण्याचे नियोजन आहे. महाविद्यालयात शिक्षण घेत असताना स्वच्छतागृहांअभावी विद्यार्थिनींची होणारी कुचंबणा व त्यातून निर्माण होणारे आरोग्याचे प्रश्न विचारात घेऊन स्वच्छतागृह उभारणीची योजना आखण्यात आली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने उभारण्यात येणाऱ्या या स्वच्छतागृहांच्या एका युनिटचा खर्च एक लाख रुपये इतका आहे. प्राथमिक टप्प्यात ५० अत्यंत गरजू संलग्नित महाविद्यालये निवडून त्यांना अशी स्वच्छतागृहे तयार करून देण्याचा मानस आहे. यासाठीही दानशूर व्यक्ती आणि संस्थांनी पुढाकार घेऊन आर्थिक मदत करावी.

त्याचप्रमाणे शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम भागास कायमस्वरूपी जोडण्यासाठी सब-वे बांधणे आणि विद्यापीठाच्या संरक्षक भिंतींवर 'सुंदर कोल्हापूर'चे दर्शन घडविण्याच्या अनुषंगाने कोल्हापूरच्या कलाकारांकडून कला-संस्कृतीदर्शक चित्रे काढून घेण्याचा मनोदयही त्यांनी जाहीर केला.

यावेळी पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते ९ लाख रुपयांच्या निधीचा धनादेश कुलगुरू डॉ. शिंदे यांना प्रदान करण्यात आला. त्याचप्रमाणे प्रातिनिधिक स्वरूपात काही महाविद्यालयांचे प्राचार्य व विद्यार्थिनी यांना बस पास योजनेसाठी निधीचे वितरण करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.